# Extension Activities and outreach programs conducted by Nss

Regd. No. 1024/Nagpur/2000

RAVIKANT RAGIT PRASHASKIYA MAHAVIDHYALAYA, RAMTEK

(RAVIKANT RAGIT ADMINISTRATIVE COLLEGE, RAMTEK)

Mouda Road, Ramtek.

(Recognised by Maharashtra State Govt. & Affiliated to K.K. Sanskrit University, Ramtek)

(Recognised by UGC Under Section 2(f))

Web Side- www.rradministrative.com Mob. No. 7072600074 Mail id: [illegible]

RRPM/IQAC/2024/03 Date: 25/04/2024

## DECLARATION

This is to declare that the information, reports, true copies and numerical data etc. furnished in this file as supporting documents is verified by IQAC and found correct.

Hence this certificate.

ASSISTANT PROF. D.V. NEWARE
IQAC- Co-Ordinator
Ravikant Ragit Prashaskiya
Mahavidyalaya
Mouda Road, Ramtek

PROF. R.V. RAGIT
PRINCIPAL
Ravikant Ragit Prashaskiya
Mahavidyalaya
Mouda Road, Ramtek

Tel. No. 9284495921, Cell- 9422816552, 9422816551

Office - Ramtek Mouda Road. Post- Nagardhan Dist. Nagpur (M.S.)[Type text]

# Extension Activities and outreach programs conducted by Nss

## RAVIKANT RAGIT PRASHASKIYA MAHAVIDHYALAY
**RAMATEK**

**(RAVIKANT RAGIT ADMINISTRATIVE COLLEGE, RAMTEK)**

Mouda Road, Ramtek.

---

## सत्र : २०२२ -२०२३

### दि. ०६ जून २०२२

### अहवाशिवरज्य दिन कार्यक्रम



RAVIKANT RAGIT PRASHASKIYA MAHAVIDHYALAYA, RAMTEK

(RAVIKANT RAGIT ADMINISTRATIVE COLLEGE, RAMTEK)

Mouda Road, Ramtek

अहवाल

प्रति,

मा. कुलसचिव
क.का.सं. विश्वविद्यालय,
रामटेक.

विषय : " शिवराज्य दिन " म्हणून 06 जून हा दिवस साजरा केल्याबाबत.

मा. महोदय,

विशा बहुउद्देशिय शिक्षण पर्यटन व पर्यावरण विकास संस्था रामटेकद्वारा संचालीत रविकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालय, रामटेक राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत महाविद्यालयात मा. प्राचार्य रविकांत रागीट यांच्या मार्गदर्शनाखाली दि. 06 / 06 / 2022 रोजी सोमवार ला " शिवस्वराज्य दिन " कार्यक्रम साजरा करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शिका म्हणून प्रा. नाईक यांनी शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळांवर मार्गदर्शन केले तर विभाग प्रमुख प्रा. उके यांनी शिवाजी महाराजांच्या शासन व्यवस्थेवर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला रा.से.यो. चे स्वयंसेवक उपस्थित असून शिवाजी महाराजांच्या जिवन चरीत्रावर प्रकाश टाकला. यामध्ये पुर्वा कावळे या विद्यार्थीनीने जिजाबाई यांची भुमिका साकारली होती तर इतर विद्यार्थ्यांनी अष्टप्रधान मंडळाची भुमिका साकारली होती. या कार्यक्रमाचे सुत्र संचालन कु. जयंती श्याम या विद्यार्थीनीने केले. या कार्यक्रमाला रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी प्रा. ज्ञानेश्वर नेवारे, प्रा. गिरासे, प्रा. शेन्डे, प्रा. नाईक, प्रा. मेश्राम, प्रा. टेंभुर्णे, प्रा. बुरडकार आदींसह कर्मचारी वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रम महाविद्यालयात साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमाची छायाचित्रे व बातमी अहवालासोबत जोडलेली आहे

दि. — 06 / 06 / 22

स्थळ — रामटेक

कार्यक्रम अधिकारी रा.से.यो.
रविकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालय
रा.से.यो. विभाग प्रमुख
प्रा. ज्ञानेश्वर नेवारे

Tel. No. 9284495921, Cell- 9422816552, 9422816551

Office - Ramtek Mouda Road. Post- Nagardhan Dist. Nagpur (M.S.)[Type text]

## Extension Activities and outreach programs conducted by Nss


कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

**Kavikulaguru Kalidas Sanskrit Vishvavidyalaya, Ramtek**

**Ramtek Office** - Administrative Building, Mouda Road, Ramtek, Dist-Nagpur - 441106 (M.S.)

**Waranga Office** - NIT Premises, Near Mor Bhavan, Sitabuldi, Nagpur - 440012 (M.S.)

Established on 18 September, 1997 - NAAC Accredited with A+ Grade

GENERAL ADMINISTRATION SECTION

Phone : [illegible] Website : [illegible]

Fax : [illegible] E-mail : [illegible]


पत्र क्र.कासंवि/सा.प्र/२०२२/ 232 दिनांक : 01.06.2022

—: परिपत्रक :—

विषय — दिनांक ०६ जून हा दिवस "शिवस्वराज्य दिन" साजरा करण्याबाबत.

संदर्भ — १) शासन पत्र क्र. संकीर्ण–२०२२/प्र.क्र.३०/विशि–५, म.शा. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई.

२) शासन पत्र क्र. शिस्वदि०४२२/प्र.क्र.०२/मवि–१/५४३०, दि. ११.०५.२०२२

[illegible]

[illegible]

सहपत्र — संदर्भ क्र. २ चे शासनपत्र

आदेशान्वये,

कुलसचिव

प्रत माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव —

[illegible]

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

सहायक कुलसचिव (सा.प्र.)

क. का. संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

# Extension Activities and outreach programs conducted by Nss






# Extension Activities and outreach programs conducted by Nss

## रागीट महाविद्यालयद्वारे



**रामटेक** ■ रविकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालय रामटेक व दमयंतीताई देशमुख बी. एड्. डी. एड्. कॉलेज रामटेक यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सोमवारी संस्थाध्यक्ष रविकांत रागीट व प्राचार्या जयश्रीताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करण्यात आला.

प्रा. उर्मिला नाईक मॅडम यांनी शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळावर मार्गदर्शन केले.विभाग प्रमुख प्रा.चेतना उके यांनी शिवाजी महाराज यांच्या शासन व्यवस्थेवर मार्गदर्शन केले.राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रावर माहिती दिली. विद्यार्थिनी पूर्वा काळे हिने जिजाबाई तर अन्य विद्यार्थ्यांनी शिवाजी तहाराज यांच्यी अष्टप्रधान

# Extension Activities and outreach programs conducted by Nss

**RAVIKANT RAGIT PRASHASKIYA MAHAVIDHYALAY**
**RAMATEK**
**(RAVIKANT RAGIT ADMINISTRATIVE COLLEGE, RAMTEK)**
Mouda Road, Ramtek.

---

**दि. ०७ जून २०२२ ते १३ जून २०२२**

**अहवाल**

**माझी वसुंधरा अभियान**

रविकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालय रामटेक, राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे माझी वसुन्धरा अभियानान्तर्गत आज दि. ०७ जून २०२२ ला एतिहासिक कोटेश्वर मंदिर नगरधन येथे , नन्दिवर्धन ज्युनियर कॉलेज नगरधन चे मा. प्राचार्य दीपक मोहोड यांच्या हस्ते वृक्षारोपन व वृक्ष भेट देउन पर्यावरण जनजागृती व स्वच्छता सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच मंदीराच्या आवारात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यात रा. से. यो. च्या स्वयंसेवकांनी सहभाग घेतला होता. यावेळी कोटेश्वर मंदिराचे अध्यक्ष श्री महेन्द्रजी चोपटे, प्रा. नाईक, प्रा. मेश्राम, तसेच रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. ज्ञानेश्वर नेवारे व स्वयंसेव उपस्थित होते. मंदिराच्या परिसरात स्वच्छता अभियान व परिसरात असलेले जलाशय स्वच्छ करण्यात आले. याच सप्ताहात वाकाटक कालीन नंदिवर्धन किल्ला नगरधन येथे रा.से.यो च्या पथकाने स्वच्छता अभियान राबवून तेथील पर्यटकांना प्लास्टीक मुक्तीचा संदेश दिला. शेवटचा टप्पा नागार्जुन बौध्दस्तूप मनसर येथे रामचंद्रजी उके कार्यकारी तसेच पुरातत्व विभागाचे गाईड यांच्या उपस्थितीत स्वच्छता अभियान राबवून कार्यक्रमाचा शेवट करण्यात आला.

या सात दिवसांच्या कालावधीत रा.स.यो.. पथकाने उस्फुर्तपणे सहभाग घेऊन वृक्षारोपन संवर्धन जलसंवर्धन प्लास्टीक मुक्त तसेच झाडांचे संगोपन इत्यादी अभियान राबून जनजागृती केली. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी प्रा. नेवारे यांनी केले. तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग, कमचारी वर्ग तसेच विद्यार्थी यांचा सुध्दा सहकार्य लाभले.

## Extension Activities and outreach programs conducted by Nss

### माझी वसुंधरा अभियाना अन्तर्गत राष्ट्रिय सेवा योजनाद्वारे राबविन्याकरिता शासनाचे व विद्यापिठाचे पत्र

**महाराष्ट्र शासन**

राष्ट्रीय सेवा योजना (मंत्रालय कक्ष), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई- ४०० ००१.
Email- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२- २२६७९५६५

क्र.- रासेयो-२०२१/प्र.क्र.७५/साशि-७ दिनांक- २८.०४.२०२२
स्मरणपत्र-२

प्रति,
कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना,
सर्व विद्यापीठे / संचालनालये

विषय- "माझी वसुंधरा अभियान" अंतर्गत दि. ३०.०५.२०२२ ते दि. ०५.०६.२०२२ या कालावधीत "सुरक्षा सप्ताह" स्थळ निश्चित करणेबाबत.
संदर्भ- या कार्यासनाचे समक्रमांक पत्र दि.१८.०४.२०२२

"माझी वसुंधरा अभियान" अंतर्गत दि. ३०.०५.२०२२ ते दि. ०५.०६.२०२२ या कालावधीत "सुरक्षा सप्ताह" घेण्यात येणार आहे. सुरक्षा सप्ताहात जिल्ह्याच्या ठिकाणी ऐतिहासिक ठिकाणे/ किल्ले परिसर/ महत्वाचे ठिकाण/ सार्वजनिक ठिकाण यापैकी मुख्य तीन ठिकाणे प्रत्येक विद्यापीठांनी निश्चित करून त्याची स्वच्छता करायची आहे. प्रत्येक जिल्ह्याच्या शहर भागात विद्यापीठाअंतर्गत जी महाविद्यालये आहेत, त्या महाविद्यालयांनी ठरविलेल्या तीन ठिकाणी सात दिवस स्वच्छता करावयाची आहे. (एक महाविद्यालय, एक दिवस स्वच्छता याप्रमाणे सात दिवस स्वच्छता)

याबाबत काही विद्यापीठांनी माहिती पाठविली आहे. तथापि ज्या विद्यापीठांची माहिती प्रलंबित आहे, त्यांनी सदर माहिती पाठवावी.

(डॉ. प्रशांतकुमार वि. वनंजे)
राज्य संपर्क अधिकारी/ विशेष कार्य अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

# Extension Activities and outreach programs conducted by Nss

महाराष्ट्र शासन

राष्ट्रीय सेवा योजना (मंत्रालय कक्ष), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई- ४०० ००१.

Email- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२- २२६७५६५

क्र.- रासेयो-२०२१/प्र.क्र.७५/साशि-७ दिनांक- ०१.०६.२०२२

प्रति,
कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना,
सर्व विद्यापीठे / संचालनालये

विषय- "माझी वसुंधरा अभियान" अंतर्गत दि. ०७.०६.२०२२ ते दि. १३.०६.२०२२ या कालावधीत आयोजित केलेल्या "पर्यावरण जनजागृती व स्वच्छता सप्ताह" आयोजनाबाबत

"पर्यावरण जनजागृती व स्वच्छता सप्ताह" दि. ३०.०५.२०२२ ते दि. ०५.०६.२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. परंतु काही अपरिहार्य कारणामुळे हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला होता.

आता हा कार्यक्रम दिनांक ०७.०६.२०२२ ते १३.०६.२०२२ या कालावधीत "पर्यावरण जनजागृती व स्वच्छता सप्ताह" आपल्या स्तरावर प्रत्येक महाविद्यालयात आयोजित करावे.

"कार्यक्रम रुपरेषा"

१) दि. ०७.०६.२०२२ रोजी "वरळी किल्ला", मुंबई या ठिकाणी श्री मा.आदित्य ठाकरे, मंत्री, पर्यावरण व श्री मा.उदय सामंत, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण या प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते "पर्यावरण जनजागृती व स्वच्छता सप्ताह" याच्या उद्घाटनाचा कार्यक्रम.

२) महाराष्ट्रातील प्रत्येक राष्ट्रीय सेवा योजना एककांनी आपल्या परिसरातील शैक्षणिक संस्था, गडकिल्ले, विहिरी, नदी, नदीघाट, तलाव, लेणी, ऐतिहासिक ठिकाणे, शासकीय रुग्णालये, सार्वजनिक ठिकाणे, बस स्थानक, रेल्वे स्थानक इ. ठिकाणी वरील सात दिवस स्वच्छता सप्ताह करणे.

३) "वातावरणातील बदल" व "स्वच्छता" या संकल्पनेवर गाव, शहर, महानगर, गर्दीतील ठिकाण, बाजार ठिकाण, बस स्थानक, रेल्वे स्थानक, गाव बाजार, वस्ती, तांडा, इत्यादि ठिकाणी पर्यावरणाचे महत्त्व, स्वच्छतेचे महत्त्व, प्लास्टीक मुक्त भारत, टाकाऊ पासून टिकाऊ, घनकचरा व्यवस्थापन, पाणी वाचवा इ. विषय/ थीम घेऊन पथनाट्ये व जनजागृतीपर कार्यक्रम करण्यात येईल.

४) स्वच्छता श्रमदान सकाळी ०७:०० ते १०:०० या वेळेत करणे व पथनाट्य व जनजागृतीपर कार्यक्रम दिवसा व सायंकाळी करणे.

५) या सप्ताहामध्ये प्रत्येक महाविद्यालयात एक "ग्रीन क्लब" निर्माण करणे. या "ग्रीन क्लब" मध्ये साधारणतः २० विद्यार्थी,विद्यार्थीनी असावेत. यांच्यासोबत एक किंवा दोन

# Extension Activities and outreach programs conducted by Nss

प्राध्यापक असावेत. (Environmental Science चे असल्यास उत्तम ) या मार्फत झाडे लावणे, झाडे जगविणे, पर्यावरण व स्वच्छता विषयक कार्यक्रम इतर रासेयोच्या विद्यार्थ्यांना घेऊन राबविणे.

६) प्रत्येक महाविद्यालयाने वरील कार्यक्रम व स्वच्छता करताना "पर्यावरण जनजागृती व स्वच्छता सप्ताह" दि. ०७.०६.२०२२ ते दि. १३.०६.२०२२ असे बॅनर असावेत, तसेच "आजादी का अमृत महोत्सव" असे टॅग वाक्य व चिन्ह असावे व माझी वसुंधरा व रासेयो चे चिन्ह व नामउल्लेख असावे.

७) प्रत्येक महाविद्यालयांनी सप्ताहाच्या पहिल्या व शेवटच्या दिवशी उद्घाटन व निरोप समारंभास विशेष निमंत्रीत पाहुणे यांना आमंत्रित करावे तसेच प्रत्येक महाविद्यालयांनी या कार्यक्रमासंबंधीची बातमी वर्तमानपत्रात, मासिके व न्युज चॅनेल व सोशल मिडिया व प्रसार माध्यमांवर प्रकाशीत/प्रदर्शीत करावे व अहवाल सादर करताना प्रसिध्दिबाबतचीही माहिती अहवालामध्ये कात्रणासहित नमूद करावे.

८) "पर्यावरण जनजागृती व स्वच्छता सप्ताह" कार्यक्रम प्रत्येक महाविद्यालयाने घेणे आवश्यक आहे. जे महाविद्यालय कार्यक्रम घेणार नाहीत, त्या महाविद्यालयाची माहिती संचालकांनी या कार्यालयास कळवावी.

९) प्रत्येक महाविद्यालयांनी स्वच्छतेसंबंधी राबविलेले कार्यक्रम याबाबतचा सात दिवसांचा अहवाल, फोटो व व्हिडिओ क्लीप, संबंधित विद्यापीठाच्या कार्यक्रम समन्वयक तथा संचालक यांना द्यावी व का.स. तथा संचालक यांनी एकत्रित माहिती या कार्यालयास हार्ड कॉपी व सॉफ्ट +कॉपी द्वारे दि. १६.०६.२०२२ पर्यंत पाठवावी. तसेच रासेयो क्षेत्रिय कार्यालय, पुणे यांनाही ईमेलव्दारे माहिती पाठवावी.

याप्रमाणे कार्यक्रमाची रुपरेषा असून त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

11/06/22

(डॉ. प्रशांतकुमार वि. वनंजे)
राज्य संपर्क अधिकारी/ विशेष कार्य अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

# Extension Activities and outreach programs conducted by Nss

कविकुलगुरु–कालिदास–संस्कृत–विश्वविद्यालय,(रामटेक) महाराष्ट्रम्

राष्ट्रीय मूल्यांकन प्रत्यायन परिषदेद्वारे A+ श्रेणी प्राप्त

राष्ट्रीय सेवा योजना

डॉ. जयवन्त चौधरी
समन्वयक

[illegible]

ककासंवि/NSS/2022/जा.क्र. 221 — दि. 02/05/2022

प्रती,

डॉ.प्रशांत कुमार वि. कनंजे
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना महाराष्ट्र शासन

**विषय :- "माझी वसुंधरा अभियान" अंतर्गत दि. ३०.०५.२०२२ ते दि. ०५.०६.२०२२ च्या कालावधीत "सुरक्षा सप्ताह" स्थळ निश्चित करण्याबाबत.........**

**संदर्भ :- पत्र.क्र.रासेयो-२०२१/प्र.क्र.७५/साशि-५/दि.२८.०४.२०२२**

आ.महोदय,

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेकच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे "माझी वसुंधरा अभियान" अंतर्गत खालील ऐतिहासिक स्थळांची स्वच्छता करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | स्थळांचे नाव |
|---|---|---|
| १. | गोळवलकर गुरुजी कॅम्पस, रामटेक | १) नगरधन किल्ला<br>२) कालिदास स्मारक<br>३) गडमंदिर रामटेक |
| २. | सेंट्रल इंडिया स्कूल ऑफ फाइन आर्ट्स, नागपूर | १) कल्याणेश्वर तेलंगखेडी,<br>२) श्री कृष्ण मंदिर परिसर, सोनेगाव,<br>३) बुटी मंदिर, सीताबिल्डी, नागपूर जिल्हा. |
| ३. | प्रशासकीय सेवा पदवी महाविद्यालय, नागपूर. | १) श्याम धाम मंदिर<br>२) रमणा मारोती मंदिर<br>३) राजाबक्षा |
| ४. | डॉ. पंजाबराव देशमुख योग महाविद्यालय, चांदूरबाजार, अमरावती | १) भक्तिधाम मंदिर<br>२) बसस्थानक चांदूरबाजार |
| ५. | ज्ञानदीप प्रशासन महाविद्यालय, नागपूर | १) विठ्ठलाचे पंढरपूर, धापेवाडा<br>२) ऐतिहासिक गणेश मंदिर, अदासा<br>३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्युझियम अँड मेमोरियल, चिचोली |
| ६. | छत्रवीर राजे संभाजी नागरी सेवा महाविद्यालय मोरवा जि. चंद्रपूर | १) गोंड राजाचा किल्ला<br>२) हिराबाईची समाधी |
| ७. | रविकांत राणीट प्रशासकीय महाविद्यालय, रामटेक | १) ऐतिहासिक कोटेश्वर मंदिर<br>२) न्दीवर्धन किल्ला नगरधन<br>३) नागार्जुन बौध्दस्तूप वृध्दाश्रम, मनसर |

डॉ.जयवन्त चौधरी
समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना
क.का.सं.वि., रामटेक

# Extension Activities and outreach programs conducted by Nss

पर्यावरण दिन कार्यक्रमाची छायाचित्रे










# Extension Activities and outreach programs conducted by Nss









# Extension Activities and outreach programs conducted by Nss

## RAVIKANT RAGIT PRASHASKIYA MAHAVIDHYALAY
**RAMATEK**

**(RAVIKANT RAGIT ADMINISTRATIVE COLLEGE, RAMTEK)**
Mouda Road, Ramtek.

---

**दि. २१ जून २०२२**

**अहवाल**

**आंतरराष्ट्रीय योग दिन**

२१ जून २०२२ ला रविकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालय रामटेक येथे,मा. प्राचार्य रविकांत रागीट यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन नगरधन या गावी करण्यात आले. होते. योग प्रशिक्षिका म्हणून लाभलेल्या प्रा. मयूरी टेंभुर्णे यांनी प्राणायाम व विविध आसने घेउन योगाचे धडे सर्व विद्यार्थ्यांना दिले त्याच बरोबर राष्ट्रिय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. ज्ञानेश्वर नेवारे मानसिक संतुलन राखन्यासाठी योगाचे विविध उपाय चित्ताच्या वृत्ती नाहिश्या करण्यासाठी पातञ्जलीच्या सुत्रांचे उदाहरन देउन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या वेळी सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. हा. कार्यक्रम राष्ट्रिय सेवा योजने अन्तर्गत घेण्यात आला.


Kavikulaguru Kalidas Sanskrit Vishvavidyalaya, Ramtek

GENERAL ADMINISTRATION SECTION

25 MAY 2022

# Extension Activities and outreach programs conducted by Nss

सत्यमेव जयते

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
शिक्षा मंत्रालय, भारत सरकार
(Ministry of Education, Govt. of India)
बहादुरशाह ज़फर मार्ग, नई दिल्ली- 110002
Bahadurshah Zafar Marg, New Delhi-110002

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**Dr. Ravindra Kumar**
**Education Officer**
9891547780
011-23604444
ravindrakr.ugc@gov.in

**20th May,2022**

To,

The Registrar of all State Universities,

**Subject:** **INTERNATIONAL DAY OF YOGA (IDY) 2022.**

Dear Sir/Madam,

It is in continuation of earlier reminders regarding International Day of Yoga 2022. It is once again requested to organize activities and share their participatory videos of International Day of Yoga on the UGC University Activity Monitoring Portal (UAMP) https://uamp.ugc.ac.in/.

(Dr. Ravindra Kumar)
Education Officer (SU)

## Extension Activities and outreach programs conducted by Nss



# Extension Activities and outreach programs conducted by Nss

**दि. ०५ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२२**

**अहवाल**

**आजादी का अमृत महोत्सव – "स्वराज्य महोत्सव"**

**हर घर तिरंगा अभियान**

**शासन परिपत्रके**

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.**

Web : www.dhepune.gov.in E-Mail :mavi.dhepune@nic.in

फोन नं.020/26122119,26051512,26130627,26124639 फॅक्स नं. 020/26111153,

क्र.: उशिसं/स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव/मवि-१/२०२२/ 6868 दिनांक: .७.२०२२

19 JUL 2022

**परिपत्रक**

**विषय: आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत " स्वराज्य महोत्सव " व " हर घर तिरंगा " या उपक्रमांच्या यशस्वी आयोजनाबाबत.**

**वाचा :** १. शासनपत्र क्र.: संकीर्ण-२०२२/प्र.क्र.८२/आस्था-२ दि. २८ जून २०२२
२. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे शासन परिपत्रक क्र.: संकीर्ण ८२२२/ प्र.क्र. ११० (भाग-२)/सां.का.४ दि. २० जून २०२२
३. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे शासन परिपत्रक क्र.: संकीर्ण ८२२२/ प्र.क्र. ११० (भाग-२)/सां.का.-४ दि. ३० जून २०२२
४. अ.शा.प.क्र.संकीर्ण-८८२२/ प्र.क्र. १६१/ सां.का.४, दि.१३.०७.२०२२
५. शासनपत्र क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.८२/ आस्था-२ दि.१४.०७.२०२२

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, दि. १२ मार्च, २०२१ ते १५ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत "आजादी का अमृत महोत्सव" या उपक्रमाचे आयोजन करण्याबाबत केंद्र शासनाकडून कळविण्यात आले आहे. त्यानुसार राज्यात सदर कालावधीमध्ये "भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" साजरा करण्याबाबत यापूर्वी वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत. केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाने जनतेच्या मनात स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती तेवत रहाव्यात व देशभक्तीची ज्वलंत भावना कायमस्वरुपी जनमानसात रहावी या उद्देशाने या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक संस्मरण करण्यासाठी "आजादी का अमृत महोत्सव" अर्थात **"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव"** अंतर्गत **दि. ११ ऑगस्ट २०२२ ते दि. १७ ऑगस्ट २०२२** या कालावधीमध्ये देशभरात **"हर घर तिरंगा"** हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

**दिनांक ९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट या कालावधीत "स्वराज्य महोत्सव" हा उपक्रम राबविण्यात येणार असून सदर उपक्रम आयोजित करण्यासाठी पर्यटन व सांस्कृतीक कार्य विभागाच्या दि.२०.०६.२०२२ व दि. ३०.०६.२०२२ च्या शासन निर्णयान्वये आयोजित करावयाच्या कार्यक्रमांचा तपशील देण्यात आला आहे, त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी, (प्रत संलग्न)**

**"हर घर तिरंगा" या अभियानांतर्गत नागरिकांनी राष्ट्रध्वजाची खरेदी स्वतः करून, आपल्या घरावर राष्ट्रध्वज फडकवणे यामध्ये अभिप्रेत आहे. या दोन्ही उपक्रमांमध्ये राज्यातील प्रत्येक विभागाने, कार्यालयाने व नागरिकाने यामध्ये सहभागी होणे अपेक्षित आहे.**

**"स्वराज्य महोत्सव"** व **"हर घर तिरंगा"** या उपक्रमामध्ये, महाविद्यालयीन व विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थ्यांचा विविध कार्यक्रम/उपक्रमात सहभाग अतिशय महत्त्वाचा राहणार आहे. महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावरील निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, तसेच प्रभात फेरी/

# Extension Activities and outreach programs conducted by Nss

पदयात्रा, पथनाट्ये यामधून विद्यार्थ्यांचा मोठया प्रमाणात सहभाग घेता येऊ शकतो. याशिवाय, विद्यार्थी विरासत योजना, गावच्या इतिहासाचे लेखन आणि सांस्कृतिक कार्यक्रम यामधूनही विद्यार्थी मोठ्या प्रमाणात भाग घेऊ शकतात आणि स्वराज्य महोत्सवाचा व्यापक हेतू साध्य होऊ शकतो. या दोन्ही अभियानाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व राष्ट्रीय छात्र सेना (NCC) च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे सहकार्य घेण्यात यावे. तेव्हा **"स्वराज्य महोत्सव"** व **"हर घर तिरंगा"** या दोन्ही उपक्रमाच्या प्रभावी व यशस्वी अंमलबजावणीसाठी आपल्या स्तरावर नियोजन करण्यात यावे.

उपरोक्तप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महाविद्यालयांनी विभागीय सहसंचालक कार्यालयास व विभागीय सहसंचालक कार्यालयांनी महाविद्यालयांचा एकत्रित अहवाल तसेच सहसंचालक कार्यालयाचा अहवाल या संचालनालयास सादर करावा. तसेच कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे यांनी विद्यापीठ आस्थापनेचा अहवाल सादर करावा.

सोबत- वरीलप्रमाणे

**(डॉ. प्रकाश बच्छाव )**
शिक्षण सहसंचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१.

प्रति,

१. कनिष्ठ प्रशासन अधिकारी, प्रशा-३ कार्यासन, प्रस्तुत संचालनालय.

२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
३. प्राचार्य/कुलसचिव, सर्व शासकीय/ अशासकीय, अनुदानित/मॉडेल डिग्री महाविद्यालये/सर्व अकृषी विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे,स्वयंअर्थ सहाय्यित विद्यापीठे/ समूह विद्यापीठे - महाराष्ट्र राज्य.
४. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

# Extension Activities and outreach programs conducted by Nss

महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र. ८२/[illegible]-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक ४ जुलै, २०२२.

प्रति,
१. संचालक,
उच्च शिक्षण/ तंत्र शिक्षण / कला शिक्षण/संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे, मुंबई.
२. सर्व कुलसचिव, अकृषी विद्यापीठे/ अभिमत विद्यापीठे/
स्वयंअर्थ सहाय्यित विद्यापीठे/ समूह विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.
३. राज्य समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना.

विषय:- आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत "स्वराज्य महोत्सव" व " हर घर तिरंगा"
या उपक्रमांच्या यशस्वी आयोजनाबाबत.
संदर्भ :- [illegible] संकीर्ण-८८२२/प्र.क्र. २६१/सां.का. ४, दि. १३/०७/२०२२
रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भीय पत्र सोबत पाठविण्यात येत आहे. दिनांक ९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट या कालावधीत स्वराज्य महोत्सव हा उपक्रम राबविण्यात येणार असून सदर उपक्रम आयोजित करण्यासाठी पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दि. ३०/०६/२०२२ च्या शासन निर्णयान्वये आयोजित करावयाच्या कार्यक्रमांचा तपशील कळविण्यात आला आहे. तसेच दि. १३ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट या कालावधीत "हर घर तिरंगा" हा उपक्रम संपूर्ण देशभर साजरा करण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत नागरिकांनी राष्ट्रध्वजाची खरेदी [illegible] आपल्या घरावर राष्ट्रध्वज फडकवणे यासाठी अपेक्षित आहे. या दोन्ही उपक्रमांमध्ये राज्यातील प्रत्येक विभागाने, कार्यालयाने व नागरिकाने यामध्ये सहभागी होणे अपेक्षित आहे.

"स्वराज्य महोत्सव" व "हर घर तिरंगा" या उपक्रमामध्ये, महाविद्यालयीन व विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थ्यांचा विविध कार्यक्रम/उपक्रमात सहभाग अतिशय महत्वाचा राहणार आहे. महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावरील निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, तसेच प्रभात फेरी/पदयात्रा, पथनाट्ये यामधून विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग घेता येऊ शकतो, याशिवाय, विद्यार्थी [illegible], [illegible] इतिहासाचे लेखन आणि सांस्कृतिक कार्यक्रम यामधूनही या विद्यार्थी मोठ्या प्रमाणात भाग घेऊ शकतात आणि स्वराज्य

महोत्सवाचा व्यापक हेतू साध्य होऊ शकतो. या दोन्ही अभियानांच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व राष्ट्रीय छात्र सेना (NCC) च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे सहकार्य घेण्यात यावे. तेव्हा "स्वराज्य महोत्सव" व "हर घर तिरंगा" या दोन्ही उपक्रमांच्या प्रभावी व यशस्वी अंमलबजावणीसाठी आपल्या स्तरावर नियोजन करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

(अजित बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

# Extension Activities and outreach programs conducted by Nss

**अहवाल**

रविकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालय, रामटेक अंतर्गत मा. प्राचार्य रविकांत रागीट यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रिय सेवा योजना अंतर्गत , आजादी का अमृत महोत्सव निमित्य “ हर घर तिरंगा अभियान” नगरधन येथे दि. ०५/०८/२०२२ रोजी राबविण्यात आले. तसेच महाविद्यालयात निबंध , वक्तृत्व , व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती , या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.



# Extension Activities and outreach programs conducted by Nss

## १. रविकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालय, रामटेक





"आझादी का अमृत महोत्सव" व "स्वराज्य महोत्सव" निमित्त
राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे चित्र प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले.










## Extension Activities and outreach programs conducted by Nss

**दि. २८ सप्टेंबर.  २०२२**

**अहवाल**

**क्रान्तिवीर भगतसिंग यांची जयन्ती**

**व माहितीचा अधिकार दिन**



# Extension Activities and outreach programs conducted by Nss





## Extension Activities and outreach programs conducted by Nss

**दि. १९ ऑक्टो. २०२२**

**स्वछभारत अभियान**

**शासन परिपत्रके**









**Extension Activities and outreach programs conducted by Nss**

RAVIKANT RAGIT ADMINISTRATIVE COLLEGE, RAMTEK

RRACR/22-23/107 Date - 18/10/22

प्रति,

मा. मुख्याधिकारी साहेब
नगर परिषद,
रामटेक.

विषय : प्लास्टीक संकलन व स्वच्छता अभियान राबविण्याबाबत.

संदर्भ : 1) महाराष्ट्र शासन, राष्ट्रीय सेवा योजना ( मंत्रालय कक्ष ) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई – यांचे पत्र क्र. रासेयो – 2022 / प्र.क्र – 149 / साशि / 07, दि. 30 / 09 / 2022.

2) [illegible] यांचे पत्र क्र. F No. A – 22041/11/202/NSS दि. 29 / 09 / 2022 च्या पत्रास अनुसरुन मा. क्षेत्रिय संचालक, रासेयो क्षेत्रिय कार्यालय, पुणे यांचे पत्र क्र. F No: NSS / CIP / RD - Pune / 2022 – 23 दि. 29 / 09 / 2022.

मा. महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भान्वये पाठविलेल्या पत्रानुसार दि. 19 ऑक्टोबर 2022 रविकांत रागीट प्रशासकिय महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागान्तर्गत स्वच्छ भारत अभियान रामटेक शहरात राबविणार आहोत. या अभियानात प्लास्टिक संकलन व स्वच्छता अभियान राबविणार आहोत. करीता आपले सहकार्य व परवानगी अपेक्षित आहे.

सविनय कार्यवाहीस सादर.

दि. - 18/10/2022

स्थळ - रामटेक

नगर परिषद, रामटेक
आवक क्र. ........
18 OCT 2022
निरीक्षकाचे सही ........

Ravikant Ragit Administrative College, Ramtek

# Extension Activities and outreach programs conducted by Nss






## Extension Activities and outreach programs conducted by Nss






# Extension Activities and outreach programs conducted by Nss

**बातमी**

# रामटेक शहरात स्वच्छ भारत अभियान

## रागीट महाविद्यालय रासेयोचा स्तुत्य उपक्रम

देशोन्नती वृत्तसंकलन...




रामटेक ■ रविकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत प्राचार्य रविकांत रागीट यांच्या मार्गदर्शनाखाली रामटेक शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. 'प्लास्टिक मुक्त भारत' हे अभियानाचे मुख्य उद्दिष्टे होते.

स्वयंसेवकांनी रामटेक बसस्थानक, आंबेडकर चौक, तहसील कार्यालय, पंचायत समिती, पोलिस स्टेशन, बाजार चौक, न्यायालय, शनिवारी वॉर्ड, रामाळेश्वर वार्ड, नगरपरिषदेसह अनेक ठिकाणाहून जवळपास १०० किलो प्लास्टिक कचरा संकलित करून डम्पिंग यार्डमध्ये दिला. उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे ३० स्वयंसेवक सहभागी झाले होते. उपक्रमाला नगर परिषदेचे मुख्याधिकारी मंगेश वासेकर यांचे सहकार्य लाभले. राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा. ज्ञानेश्वर नेवारे यांनी उपक्रमाचे आयोजन केले. विभाग प्रमुख प्रा. चेतना उके, प्रा. उर्मिला नाईक, प्रा अनिल मिरासे, प्रा. टेंभुर्णे, प्रा. शेंद्र, प्रा. अंबादे, प्रा. बुरडकर, प्रा. वानखेडे, प्रा. मेश्राम, प्रा. मोंढे यांचे सहकार्य लाभले. (ता.प्र.)

# रामटेक शहरात स्वच्छ भारत अभियान




रामटेक : शहरातील रविकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने स्वच्छ भारत व प्लास्टिकमुक्त शहर अभियान राबविण्यात आले. यात शहरातील बसस्थानक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, तहसील कार्यालय, पंचायत समिती, पोलीस ठाणे, बाजार चौक, न्यायालय, शनिवार वॉर्ड, रामाळेश्वर वॉर्ड, नगर परिषद कार्यालय परिसरातील प्लास्टिक कचरा संकलन करून तो पालिकेच्या डम्पिंग यार्डमध्ये टाकण्यात आला. या अभियानात ३० स्वयंसेवक सहभागी झाले होते. त्यांनी जवळपास एक क्विंटल प्लास्टिक गोळा केला. या उपक्रमाला पालिकेचे मुख्याधिकारी मंगेश वासेकर यांचे सहकार्य लाभले. या अभियानात राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा. ज्ञानेश्वर नेवारे, विभागप्रमुख प्रा. चेतना उके, प्रा. उर्मिला नाईक, प्रा. अनिल मिरासे, प्रा. टेंभुर्णे, प्रा. शेंद्रे, प्रा. अंबादे, प्रा. बुरडकर, प्रा. वानखेडे, प्रा. मेश्राम, प्रा. मोंढे, कारेमोरे, समर्थ, मोहनकर, ठाकरे यांच्यासह विद्यार्थी सहभागी झाले होते.

# Extension Activities and outreach programs conducted by Nss

**दि. ११ नोव्हें. २०२२**
**कायदेविषयक सेमिनार**






# Extension Activities and outreach programs conducted by Nss




**बातमी**



# रागीट महाविद्यालयात कायदेविषयक सेमिनार

देशोन्नती वृत्तसंकलन...

रामटेक ■ तालुका विधी सेवा समिती व रविकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालय, रामटेक यांच्या संयुक्त विद्यमाने रागीट महाविद्यालयात ११ नोव्हेंबर रोजी एक दिवसीय कायदेविषयक सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते.

भारतीय संविधान, नागरिकांचे मूलभूत अधिकार व कर्तव्ये या विषयावर संस्थेचे अध्यक्ष रविकांत रागीट आणि प्राचार्य जयश्रीताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हे सेमीनार आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सहदिवानी न्यायाधीश डी.एस. सेवाने, दिवाणी न्यायाधीश सालपुले, अधिवक्ता तालुका विधी सेवा समिती रामटेक अॅड. आनंद गजभिये, बी.ए. प्रशासकीय विभागाच्या प्रमुख प्रा. वंदना उके आदी प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाबद्दल विशेष मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉली वळवणकर, संचालन प्रा. निकिता अंबादे तर आभार प्रा. उर्मिला नाईक यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्रा. गंगा मोहे, प्रा. शालू नानरखेडे, प्रा. किरण शेंडे, प्रा. कल्पा मेश्राम, प्रा. मयुरी देशमुख, गीता समर्थ, सुरेश कारेमोरे, प्रा. ज्ञानेश्वर नेवारे, अनिल भिरासे, अतुल बुरडकर, राजेश मोहनकर, संदीप ठाकरे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले. (ता.प्र.)

14/11/2022

# Extension Activities and outreach programs conducted by Nss

## दि. २६ नोव्हें. २०२२

## संविधान दिन

## शासकीय परिपत्रके

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@nic.in
फोन नं.020/26122119,26051512,26130627,26124639 फॅक्स नं. 020/26111153.
क्र.: उशिसं/मवि-१/संविधान दिन/२०२२/१३८३९ दिनांक: .११.२०२२
22 NOV 2022

**परिपत्रक**

**विषय: २६ नोव्हेंबर या दिवशी संविधान दिवस साजरा करण्यासाठी राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतने व तत्सम शैक्षणिक संस्थांमध्ये विविध कार्यक्रम आयोजित करणेबाबत.**

संदर्भ: १. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन परिपत्रक क्र.: संकीर्ण-२०२१/प्र.क्र. १०५/ वि.शि.५ दि. ८.२.२०२२
२. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/संविधान दिन/मवि-१/२०२२/१२५० दि. ९.२.२०२२

संदर्भ क्र. १ च्या अनुषंगाने दि. २६ नोव्हेंबर या संविधान दिनी विविध कार्यक्रम आयोजित करण्याबाबत संदर्भ क्र. २ अन्वये यापुर्वी सूचित करण्यात आले आहे. (प्रत संलग्न)

दिनांक २३ व २४ नोव्हेंबर २०१९ रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या राज्यपाल परिषदेमध्ये करण्यात आलेल्या शिफारशीमध्ये भारताच्या घटनेची माहिती होण्यासंदर्भात, **संविधान दिवस** या दिवशी विद्यापीठांनी विविध कार्यक्रम आयोजित करावेत अशी शिफारस करण्यात आली होती.

संदर्भांकित परिपत्रक तसेच उपरोक्त शिफारशीच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, भारतीय संविधानाबाबत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांना अधिकाधिक माहिती होण्याकरिता दि. २६ नोव्हेंबर, या "**संविधान दिवस**" रोजी संपूर्ण राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतने व तत्सम शैक्षणिक संस्थांमध्ये संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन, चर्चासत्रे, भारतीय संविधाना संदर्भात घोषवाक्य स्पर्धा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

कुलसचिव, सर्व अकृषी/अभिमत/ स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे यांनी विद्यापीठ आस्थापनेचा अहवाल संचालनालयास सादर करावा तसेच विभागीय सहसंचालक कार्यालयांनी त्यांच्या कार्यकक्षेतील महाविद्यालयांचा अहवाल संकलित करुन एकत्रित स्वरुपात संचालनालयास सादर करावा.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१.

प्रति,
१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव, सर्व अकृषी/अभिमत/ स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
३. प्राचार्य, शासकीय/अशासकीय-अनुदानित/विना अनुदानित/मॉडेल डिग्री महाविद्यालये-महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव: मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.

# Extension Activities and outreach programs conducted by Nss


महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)

महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे- ४११ ००१

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२३१९/२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१२११५३


क्र.उशिसं/संविधान दिन/मवि-१/२०२२/ 9260 दिनांक- /२/२०२२

-9 FEB 2022

प्रति,

१. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव, सर्व अभिमत विद्यापीठे- महाराष्ट्र राज्य.
३. कुलसचिव, सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे- महाराष्ट्र राज्य.
४. प्राचार्य, शासकीय/अशासकीय/अनुदानित/विनाअनुदानित महाविद्यालये/मॉडेल डिग्री महाविद्यालये - महाराष्ट्र राज्य.

**विषय: २६ नोव्हेंबर या दिवशी संविधान दिवस साजरा करण्यासाठी राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतने व तत्सम शैक्षणिक संस्थांमध्ये विविध कार्यक्रम आयोजित करणेबाबत.**

संदर्भ: उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन परिपत्रक क्र.: संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१०५/ वि.शि.५ दि. ८.२.२०२२

संदर्भांकित शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे, कृपया अवलोकन करावे.

दिनांक २३ व २४ नोव्हेंबर २०१९ रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या राज्यपाल परिषदेमध्ये करण्यात आलेल्या शिफारशीमध्ये भारताच्या घटनेची माहिती होण्यासंदर्भात, **संविधान दिवस** या दिवशी विद्यापीठांनी विविध कार्यक्रम आयोजित करावेत अशी शिफारस करण्यात आली होती.

संदर्भांकित परिपत्रक तसेच उपरोक्त शिफारशीच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, भारतीय संविधानाबाबत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांना अधिकाधिक माहिती होण्याकरिता दि. २६ नोव्हेंबर, या **"संविधान दिवस"** रोजी संपूर्ण राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतने व तत्सम शैक्षणिक संस्थांमध्ये संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन, चर्चासत्रे, भारतीय संविधाना संदर्भात घोषवाक्य स्पर्धा असा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. सदर कार्यक्रमांचे आयोजन करताना कोव्हीड प्रतिबंधक नियमांचे पालन करणे अनिवार्य आहे.

(प्रतिभा दीक्षित)
कनिष्ठ प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालक(उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, पुणे -१

प्रत: मा. अजित बाविस्कर- उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना संदर्भांकित परिपत्रकाच्या अनुषंगाने माहितीस्तव सादर.

## Extension Activities and outreach programs conducted by Nss

# अधिकारों की जानकारी

## रविकांत रागिट महाविद्यालय, रामटेक



संवाददाता। रामटेक. संविधान दिवस पर रविकांत रागिट प्रशासनिक महाविद्यालय रामटेक एवं दमयंती ताई देशमुख डी.एड.और बी.एड. कॉलेज रामटेक अध्यक्ष रविकांत रागिट के मार्गदर्शन में राष्ट्रीय सेवा योजना के तहत रविकांत रागिट महाविद्यालय की प्राचार्या जयश्री देशमुख के मार्गदर्शन में संविधान निर्माता डॉ. आंबेडकर की प्रतिमा पर माल्यार्पण कर नमन किया गया। पश्चात भारतीय संविधान के प्रास्ताविक का वाचन किया गया। साथ ही छात्र-छात्राओं के लिए संगोष्ठी का आयोजन किया गया। प्राध्यापक उर्मिला नाईक, चेतना उके, निकिता अंबादे, गंगा मोंढे, शालू वानखेड़े, किरण शेंद्रे, कला मेश्राम, मयूरी टेंभुर्ने, डॉली कलमकर, गीता समर्थ, सुरेश कारेमोरे, ज्ञानेश्वर नेवारे, अनिल मिरासे, अतुल बदरकर, राजेंद्र मोहनकर, संदीप ठाकरे, जयश्री कामडी आदि उपस्थित थे।

# Extension Activities and outreach programs conducted by Nss

## विशेष श्रम संस्कार शिबिर
## ०९ जानेवारी ते १५ जानेवारी २०२३

नवभारत

# आदिवासी बहुल बेलदा में रासेयो शिविर

## 7 दिवसीय कार्यक्रम में छात्रों का मार्गदर्शन व जनजागृति

■ देवलापार (सं.). रामटेक के रविकांत रागीट कॉलेज ऑफ एडमिनिस्ट्रेशन के तत्वावधान में आदिवासी बहुल बेलदा गांव में राष्ट्रीय सेवा योजना शिविर का आयोजन किया गया. 9 जनवरी से आयोजित 7 दिवसीय वार्षिक विशेष श्रमिक शिविर का शुभारंभ बेलदा के सरपंच उमेश भंडारकर के हाथों किया गया.

इस शिविर की थीम 'युवाओं का जुनून, गांव-शहर का विकास' थी. मंच पर जिला परिषद सदस्य शांताताई कुमरे, उपसरपंच द्रौपदी वरखड़े, गुलशन फाउंडेशन मुंबई के निकम सर, दमयंती देशमुख, बीएड एवं डीएड कॉलेज की प्राचार्या जयश्रीताई देशमुख, सचिव बेलदा ग्राप के निवृत्ति नेवारे, राजकीय आश्रम स्कूल बेलदा के प्राचार्य सतीश छपाने, जिप प्राथमिक विद्यालय बेलदा की प्राचार्या श्रीमती तलमले, निकेश रणदीवे मुख्य रूप से उपस्थित थे. श्रम संस्कार शिविर के तहत विभिन्न विषयों पर चर्चा सत्र का आयोजन किया गया.



समतादूत बार्टी के राठौड़ ने छात्रों का मार्गदर्शन किया. गांवों में स्वच्छता अभियान चलाकर लोगों को नशामुक्ति, अंधश्रद्धा उन्मूलन, बेटी बचाओ और शिक्षा, दहेज बंदी, माझी वसुंधरा अभियान, पौधारोपण और पेड़ बचाओ जैसे विभिन्न विषयों पर जागरुकता की गई. महिला सशक्तिकरण पर प्रो.चेतना उके ने प्रकाश डाला. इस दौरान प्रतिदिन विभिन्न स्थानों पर श्रमदान एवं स्वच्छता अभियान चलाया गया. समापन समारोह में डॉ.जयवंत चौधरी, सरपंच उमेश भंडारकर, उपसरपंच द्रौपदी वरखड़े, निवृति नेवारे, राजेश राठौड़, ढोले सर, श्रीमती देशपांडे उपस्थित थीं. कार्यक्रम का परिचय प्रो.ज्ञानेश्वर नेवारे ने तथा संचालन आदेश मानकर और प्रगति तडस ने आभार माना.

Nagpur-metro Edition
24-january-2023 Page No. 3
epaper.enavabharat.com

# Extension Activities and outreach programs conducted by Nss

## नवराष्ट्र

# बेलदा येथे रासेयोचे शिबिर

देवलापार, वार्ताहर. रविकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालय, रामटेक यांच्या वतीने आदिवासीबहुल बेलदा गावात 9 ते 15 जानेवारी दरम्यान 'युवकांचा ध्यास, ग्राव-शहर विकास' या थीमवर राष्ट्रीय सेवा योजना शिबिर राबविण्यात आले. सात दिवसीय वार्षिक विशेष श्रमसंस्कार शिबिराला बेलदाचे सरपंच उमेश भांडारकर यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.



याप्रसंगी जि.प.सदस्या शांता कुमरे, उपसरपंच द्रौपदी वरखडे, गुलशन फाऊंडेशन मुंबईचे निकम, दमयंतीताई देशमुख बी.एड्. व डी.एड्.कॉलेजच्या प्राचार्या जयश्री देशमुख, बेलदाचे ग्रा.पं.सचिव निवृत्ती नेवारे, शासकीय आश्रमशाळा बेलदाचे मुख्याध्यापक सतीष छपाणे, जि.प.शाळेच्या मुख्याध्यापिका तलमले, निकेश रणदिवे प्रामुख्याने उपस्थित होते. विशेष श्रम संस्कार शिबिरांतर्गत विविध विषयांवर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. 'मोबाईलच्या युगात हरवत चाललेला युवक' या विषयावर समतादूत बार्टी चे राठोड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गावांमध्ये स्वच्छता अभियान राबवून पथनाट्याद्वारे व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, बेटी बचाव बेटी पढाव, हुंडाबंदी, माझी वसुंधरा अभियान, झाडे लावा-झाडे जगवा, या विविध विषयांवर लोकप्रबोधन करण्यात आले. उत्तम आरोग्यासाठी योगप्रशिक्षक प्रा.अतुल गाळेराव यांच्या मार्गदर्शनात योग शिबीराचे आयोजन करण्यात आले. महिला सशक्तीकरणावर प्रा.चेतना उके यांनी प्रकाश टाकला व सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरणातून युवकांच्या मनावर चांगले संस्कार रुजविण्यात आले. शिबिरात सात दिवस दररोज वेगवेगळ्या ठिकाणी श्रमदान व स्वच्छता अभियान राबविण्यात आले. समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जि.प.सदस्या शांता कुमरे तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. जयवंत चौधरी, सरपंच उमेश भांडारकर, प्रमुख पाहुणे उपसरपंच द्रौपदी वरखडे, निवृत्ती नेवारे, राजेश राठोड, ढोले, देशपांडे आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.ज्ञानेश्वर नेवारे, संचालन आदेश मानकर तर आभार प्रदर्शन प्रगती तडस यांनी केले. शिबिराला रासेयोच्या संयोजिका प्रा.निकिता अंबाते. प्रा.अनिल मिरासे व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

### निधन

**हरिभाऊ जुनघरे**



**बाजारगाव.** येथील रहिवासी हरिभाऊ उमाजी जुनघरे (85) यांचे निधन झाले.

**संतोष भगत**



**कामठी.** जुनी ओली निवासी संतोष भगत यांचे निधन झाले.

Orange City Metro Edition
21 January 2023 Page No. 2
epaper.navarashtra.com

## पुण्य नगरी

# बेलदा येथे रासेयोचे सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिर



**मनसर** : रविकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालय, रामटेक यांच्या विद्यमाने आदिवासीबहुल बेलदा गावात राष्ट्रीय सेवा योजना शिबिर ९ ते १५ जानेवारीपर्यंत राबविण्यात आले.

या श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन सरपंच उमेश भांडारकर यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व थोर संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून शिबिराची सुरुवात करण्यात आली. शिबिराची संकल्पना 'युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास' अशी होती. यावेळी मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद सदस्या शांता कुमरे, उपसरपंच द्रौपदी वरखडे, गुलशन फाउंडेशन मुंबईचे निकम व दमयंती देशमुख बीएड व डीएड कॉलेजच्या प्राचार्या जयश्री देशमुख, सचिव निवृत्ती नेवारे, शासकीय आश्रमशाळा बेलदा मुख्याध्यापक सतीश छपणे, जि.प. प्राथमिक शाळा मुख्याध्यापिका तलमले व निकेश रणदिवे यांची उपस्थिती होती. 'मोबाइलच्या युगात हरवीत चाललेला युवक' या विषयावर समतादूत बार्टीचे राठोड यांनी मार्गदर्शन केले. दरम्यान, स्वच्छता अभियान, पथनाट्यातून व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, बेटी बचाओ, बेटी पढाओ, हुंडाबंदी, माझी वसुंधरा अभियान, 'झाडे लावा-झाडे जगवा,' या विविध विषयांवर लोकप्रबोधन करण्यात आले. प्रा. अतुल गाळेराव व प्रा. चेतना उके यांनी प्रकाश टाकला. समारोपीय कार्यक्रमाला जि.प. सदस्या शांता कुमरे, डॉ. जयवंत चौधरी, सरपंच उमेश भांडारकर, उपसरपंच द्रौपदी वरखडे, निवृत्ती नेवारे, राजेश राठोड, ढोले सर व देशपांडे मॅडम उपस्थित होत्या. प्रास्ताविक प्रा. ज्ञानेश्वर नेवारे यांनी, तर संचालन आदेश मानकर यांनी केले. आभार प्रगती तडस हिने मानले. रासेयो संयोजिका प्रा. निकिता अंबाते, प्रा. अनिल मिरासे व राष्ट्रीय स्वयंसेवकांनी सहकार्य केले.

Smart Nagpur Edition
Jan 20, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com

# Extension Activities and outreach programs conducted by Nss

## लोकमत

### बेलदा येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर



देवलापार : रामटेक येथील रविकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालयाच्या वतीने आदिवासीबहुल बेलदा येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर पार पडले. बेलदा येथील सरपंच उमेश भांडारकर यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जि.प. सदस्य शांता कुमरे, उपसरपंच द्रौपदी वरखडे, निकम, दमयंतीताई देशमुख बी.एड. व डी.एड. कॉलेजच्या प्राचार्य जयश्री देशमुख, ग्रामसचिव निवृत्ती नेवारे, शासकीय आश्रमशाळेचे मुख्याध्यापक सतीश छपाणे, जि.प. शाळेच्या मुख्याध्यापिका तलमले, निकेश रणदिवे आदी उपस्थित होते. 'युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास' या थिमवर आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिरांतर्गत विविध विषयावर चर्चासत्र पार पडले. 'मोबाइलच्या युगात हरवत चाललेला युवक' या विषयावर बार्टीचे समतादूत राठोड यांनी मार्गदर्शन केले. शिबिरादरम्यान ग्रामस्वच्छता अभियान, पथनाट्याद्वारे व्यसनमुक्ती जनजागृती, अंधश्रद्धा निर्मूलन, बेटी बचाव बेटी पढाओ, हुंडाबंदी, माझी वसुंधरा अभियान, झाडे लावा-झाडे जगवा आदींवर प्रबोधन करण्यात आले. प्रा. अतुल गाळेराव, प्रा. चेतना उके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जि.प. सदस्य शांता कुमरे, डॉ. जयवंत चौधरी, सरपंच उमेश भांडारकर, उपसरपंच द्रौपदी वरखडे, निवृत्ती नेवारे, राजेश राठोड, ढोले, देशपांडे यांच्या उपस्थितीत शिबिराचा समारोप झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. ज्ञानेश्वर नेवारे यांनी केले. संचालन आदेश मान्कर यांनी तर आभार प्रगती तडस हिने मानले. प्रा. निकिता अंबाते, प्रा. अनिल मिरासे व स्वयंसेवकांनी सहकार्य केले.

Hello Nagpur Gramin
Page No. 5 Jan 21, 2023
Powered by: erelego.com

## नवराष्ट्र

### बेलदा येथे विशेष श्रमसंस्कार शिबिर

**रासेयोचे सात दिवसीय आयोजन**



देवलापार, वार्ताहर. कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक संलग्नित, रविकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालय, रामटेकचे संस्थाध्यक्ष रविकांत रागीट यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवांतर्गत सात दिवसीय वार्षिक विशेष श्रमसंस्कार शिबिराचे बेलदा येथे आयोजन करण्यात आले आहे. सरपंच उमेश भांडारकर यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पणाने शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

'युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास' अशी शिबीराची थिम आहे. याप्रसंगी जि.प.सदस्य शांता कुमरे, उपसरपंच द्रौपदी वरखडे, गुलशन फाऊंडेशन मुंबईचे निकम, दमयंतीताई देशमुख बी.एड्. व डी.एड्. कॉलेजच्या प्राचार्या जयश्री देशमुख, बेलदा ग्रा.पं. सचिव निवृत्ती नेवारे, शासकीय आश्रमशाळा बेलदाचे मुख्याध्यापक सतीश छपाणे, जि.प.प्राथ.शाळा बेलदाच्या मुख्याध्यापिका तलमले, ग्रा.पं.सदस्य किशोर कुमरे, उमेश कुंभारकर, अनिल जैस्वाल, शिवलाल खंडाते, मंदा भांडारकर, मनूला वरखडे, अंजु उईके, रेश्मा भलावी, संयोजक निकेश रणदिवे प्रमुखाने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.ज्ञानेश्वर नेवारे, संचालन रासेयो स्वयंसेविका प्राची गिरडे तर आभार प्रदर्शन जयभीम लांजेवार यांनी केले. कार्यक्रमाला रासेयो संयोजिका प्रा.निकिता अंबादे, प्रा.अनिल मिरासे व राष्ट्रीय स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Orange City Metro Edition
13 January 2023 Page No. 2
epaper.navarashtra.com

# Extension Activities and outreach programs conducted by Nss

## बेलदा में राष्ट्रीय सेवा योजना का 7 दिवसीय श्रम संस्कार शिविर



संवाददाता| रामटेक. कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक संलग्नित, रविकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालय, रामटेक के संस्थाध्यक्ष रविकांत रागीट के मार्गदर्शन में बेलदा में राष्ट्रीय सेवा योजना द्वारा आजादी के अमृत महोत्सव अंतर्गत 7 दिवसीय वार्षिक विशेष श्रम संस्कार शिविर का आयोजन किया गया था।

